**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.२ यांची जबानी**

मी याद्वारे शपथपूर्वक कथन करतो की,

माझे नाव – बाळासाहेब सखाहरी कोकणे

माझे वय ४८ वर्षे व्यवसाय शेती

राहणार शेरणखेल, ता.अकोले, जि.अहमदनगर.

**सरतपास अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी वकील श्रीमती के.आर.उतळे यांचेमार्फत–**

**१.** दिनांक १२.०४.२०१९ रोजी पोलिसांनी मला कोठेही पंचनाम्यासाठी बोलावले नव्हते. पोलिसांनी माझ्यासमोर कोणताही पंचनामा केलेला नाही. पोलिसांनी माझ्यासमोर काहीही जप्त केलेले नाही. मी आमच्या गावात असताना पोलिसांनी तयार पंचनाम्यांवर माझ्या सह्या घेतल्या. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविला. त्यावरील अ.क्र.२ वरील सही माझीच आहे. ती सही मी ओळखतो. परंतु, त्या पंचनाम्यातील मजकूर मला माहित नाही. त्या घटनास्थळ पंचनाम्यावरील सहीला **निशाणी पी–३८** देण्यात आली. आता मला मोबाईल जप्तीचा पंचनामा दाखविला. त्यावरील अ.क्र.२ वरील सही माझीच आहे. ती सही मी ओळखतो. परंतु, त्या पंचनाम्यातील मजकूर मला माहित नाही. त्या जप्ती पंचनाम्यावरील सहीला **निशाणी पी–३९** देण्यात आली. आता मला अपघातातील बजाज प्लॅटीना मोटारसायकल जप्तीचा पंचनामा दाखविला. त्यावरील अ.क्र.२ वरील सही माझीच आहे. ती सही मी ओळखतो. परंतु, त्या पंचनाम्यातील मजकूर मला माहित नाही. त्या जप्ती पंचनाम्यावरील सहीला **निशाणी पी–४०** देण्यात आली. आता मला अपघातातील हिरो–होंडा पॅशन–प्रो मोटारसायकल जप्तीचा पंचनामा दाखविला. त्यावरील अ.क्र.२ वरील सही माझीच आहे. ती सही मी ओळखतो. परंतु, त्या पंचनाम्यातील मजकूर मला माहित नाही. त्या जप्ती पंचनाम्यावरील सहीला **निशाणी पी–४१** देण्यात आली.

**(साक्षीदार अभियोग पक्षास सहाय्य करीत नसल्याने सहा.सरकारी वकील यांनी केलेल्या विनंतीनुसार त्यांना साक्षीदारास उलटतपासामध्ये विचारतात त्या स्वरुपाचे प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात आली.)**

२. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १२.०४.२०१९ रोजी पोलीस हेड कॉन्स्टेबल एस.पी.वाघ यांनी मला शेरणखेल ते पिंपळगाव नाकविंदा रस्त्यावर किनई ओढ्याजवळ अपघाताच्या ठिकाणी घटनास्थळ पंचनाम्यासाठी बोलावले होते. हे म्हणणे खरे नाही की, ते घटनास्थळ साक्षीदार संजय राधाकिसन कासार यांनी दाखविले. हे म्हणणे खरे नाही की, अपघातस्थळी २० फूट रुंदीचा उतार व चढाव असलेला वळणाचा रस्ता असून त्या रस्त्याच्या दोन्ही बाजूंना अंदाजे दोन ते तीन फूट रुंदीच्या साईड पट्ट्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, अपघाताच्या ठिकाणी रस्त्याला उतार असून शेरणखेल गावाकडे रस्ता उंच चढावाचा आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर वळण असून तेथे किनई ओढा व छोटा पूल आहे. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळी अपघातातील वाहनांचे प्लॅस्टीकचे तुकडे पडलेले होते व दारुच्या बाटल्यांचे काचेचे तुकडे पडलेले दिसत होते. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी माझेसमोर घटनास्थळाचा दिसत्या परिस्थितीनुसार पंचनामा केला. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी तो पंचनामा मला वाचून दाखवून त्यावर माझी सही घेतली.

३. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी माझ्यासमोर एक कार्बन ए–४० कंपनीचा काळया रंगाचा बॅटरीसह मोबाईल व नोकिया–३ मॉडेल टी.ए.१०३२ चा काळया रंगाचा बॅटरीसह मोबाईल जप्त केले. हे म्हणणे खरे नाही की, त्यानुसार पोलिसांनी माझ्यासमोर जप्ती पंचनामा तयार केला. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी तो मला वाचून दाखवून त्यावर माझी सही घेतली.

**४.** हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी माझ्यासमोर बजाज कंपनीची प्लॅटीना मोटारसायकल क्र.एम.एच.१७–बी.सी.२०५८ जप्त केली. हे म्हणणे खरे नाही की, त्या मोटारसायकलीचे उजवे फूटवेअर वाकलेले असून ब्रेक बेंड होवून मागे वाकलेला व तुटलेला दिसत होता. हे म्हणणे खरे नाही की, त्या मोटारसायकलीची फायबरची डिकी अर्धी तुटलेली दिसत होती. हे म्हणणे खरे नाही की, त्यानुसार पोलिसांनी माझ्यासमोर जप्ती पंचनामा तयार केला. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी तो मला वाचून दाखवून त्यावर माझी सही घेतली.

**५.** हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी माझ्यासमोर लाल रंगाची हिरो–होंडा कंपनीची पॅशन–प्रो मोटारसायकल क्र.एम.एच.१७–सी.आर.३१४७ जप्त केली. हे म्हणणे खरे नाही की, त्या मोटारसायकलीला पुढे खोपडी व हेड लाईट नसून वायरी बाहेर आलेल्या दिसत होत्या. हे म्हणणे खरे नाही की, त्या मोटारसायकलीचा उजवा बंपर मुडपलेला दिसत असून ब्रेक मागील बाजूस वाकलेला दिसत होता. हे म्हणणे खरे नाही की, त्यानुसार पोलिसांनी माझ्यासमोर जप्ती पंचनामा तयार केला. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी तो मला वाचून दाखवून त्यावर माझी सही घेतली.

**६.** हे म्हणणे खरे नाही की, या पंचनाम्यांवेळी बाळासाहेब रावसाहेब कासार हे अन्य पंच म्हणून हजर होते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला शिक्षा होऊ नये म्हणून मी याकामी खोटी साक्ष देत आहे.

**<u>आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.टी.एस.फापाळे यांचेतर्फे उलटतपास–</u>**

**७.** नाकारला.

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत
सदरचा जबाब माझे समक्ष नोंदविणेत आला.

DHIRAJ MARUTI HINGLAJKAR
Digitally signed by DHIRAJ MARUTI HINGLAJKAR
Date: 2026.03.23 17:53:00 +0530

**(डी.एम.हिंग्लजकर)**

**दिनांक – २३.०३.२०२६**

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अकोले,**
**ता.अकोले, जि.अहमदनगर**